# प्रेसनोट

## ‘शिक्षक दिनानिमित्त’ येरवडा पोलीस ठाण्याकडून शिक्षकांना शुभेच्छा पत्रे देवून सन्मान.

दिनांक ०५/०९/२०१८ रोजी सर्वत्र ‘शिक्षक दिन’ साजरा करणेत आला. शिक्षक दिनाचे औचित्य साधून, ज्ञानदानाचे कार्य करणारे सेवाव्रती गुरूजनांना पुणे शहर पोलीस आयुक्तालयामार्फत शुभेच्छा पत्रे देवून वंदन करणेत आले. या उपक्रमाअंतर्गत येरवडा पोलीस ठाण्याकडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकडून येरवडा पोलीस ठाण्याचे हद्दीतील बिशप हायस्कूल, नगरवाला स्कूल, सेंट अरनॉल्ड हायस्कूल, इनामदार हायस्कूल, अग्रेसन हायस्कूल, गेनबा मोझे हायस्कूल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, नेताजी हायस्कूल अशा विविध शाळा, महाविद्यालयात जावून, तेथील मुख्याध्यापक व शिक्षकांना शुभेच्छा पत्रे देवून त्यांचा सन्मान करण्यात आला.



